दि जळगाव जिल्हा मध्यवर्ती
सहकारी बँक लि., जळगाव

नोंदणी क्र. ११२९ दि. २७.०५.१९१६ बँकिंग परवाना नं. आरपीसीडी
(एमआरओ) २२७०/१८.०१.०३८/२०११-१२ दि. २८.०३.२०१२

मुख्य कार्यालय : २७, रिंग रोड, जळगाव – ४२५००२
headoffice@jdccbank.com, jdccbankjal@gmail.com
९४०४३३४९११, ९०६७३३४९११, ९९७५८२४९११, ७०५८०३४९११

# -0- जाहिरात -0-

## कारकून (सपोर्ट स्टाफ) पदाच्या भरती करिता आवश्यक सुचना

**जळगांव जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि.जळगांव यांना खालील रिक्तपदे भरण्याकरीता निवड सुची तयार करण्यासाठी सरळ सेवा भरतीसाठी पात्र उमेदवारांकडून विहीत नमुन्यात ऑनलाईन अर्ज मागविण्यात येत आहे. बँकेचे संकेत स्थळ- www.jdccbank.com व www.jalgaondcc.com**

| अ.नं. | तपशिल | दिनांक |
|---|---|---|
| 1 | वेबसाईटवर अर्ज भरणे | दि. 19/10/2025 ते दि. 31/10/2025 पर्यंत |
| 2 | परिक्षा शुल्क ऑनलाईन स्विकरण्याचा अंतिम दिनांक | दि. 19/10/2025 ते दि. 31/10/2025 पर्यंत |
| 3 | परिक्षा दिनांक | बँकेच्या संकेत स्थळावर अलाहिदा प्रसिध्द करण्यात येईल. |
| 4 | परिक्षा प्रवेशपत्र डाऊनलोड करण्याचा दिनांक | बँकेच्या संकेत स्थळावर अलाहिदा प्रसिध्द करण्यात येईल. |
| 5 | मुलाखत दिनांक | ऑनलाईन परिक्षा निकालानंतर बँकेच्या संकेत स्थळावर अलाहिदा प्रसिध्द करण्यात येईल. |

## -0- सुचना -0-

1) परिक्षा शुल्क ऑनलाईन भरणा केल्याशिवाय रजिस्ट्रेशन प्रक्रिया पूर्ण होणार नाही.
2) उमेदवारांनी ऑनलाईन अर्ज भरतांना त्यांचा ईमेल-आयडी, मोबाईल क्रमांक व आधारकार्ड क्रमांक अचुक भरणे आवश्यक आहे.
3) उमेदवारांनी ऑनलाईन अर्ज भरतांना सदर पदासाठी आवश्यक पात्रता धारक असल्याची खात्री करुनच अर्ज भरावा.
4) सदर भरती प्रक्रिये दरम्यान बँकेच्या संकेत स्थळावर वेळोवेळी अवलोकन करुन भरती प्रक्रियेची अद्ययावत माहिती प्राप्त करण्याची जबाबदारी उमेदवारांची राहील.

## शैक्षणिक अर्हता :-

| पदाचे नाव | पदसंख्या | वयोमर्यादा | आवश्यक शैक्षणिक अर्हता |
|---|---|---|---|
| कारकून (सपोर्ट स्टाफ) | 220 | किमान 21 वर्ष व कमाल 35 वर्ष | उमेदवार हा मान्यताप्राप्त विद्यापीठाची किमान 50% मार्कांनी उत्तीर्ण झालेला कोणत्याही शाखेचा पदवीधर अथवा पदव्युत्तर परिक्षा MSCIT किंवा शासन मान्य संस्थेतून संगणकातील सर्टिफिकेट कोर्स उत्तीर्ण झालेला असावा. कोणत्याही शाखेतून बी.ई. उत्तीर्ण उमेदवार तसेच बी.एस.सी. (संगणक) व कृषी पदवी धारक उमेदवारांसाठी सदरची अट शिथील राहील. |
| Clerk (Support Staff) | 220 | Minimum Age 21 Maximum Age 35 | Any Graduate Or Post Graduate from recognized university Passed with minimum 50% marks MSCIT / Government approved Certificate Course in Computers (If candidate is Bachler in Engineer, B.s.c.( Computer) or Graduate B.s.c.( Agril.) Graduate then this will be relaxable) |

उमेदवार अर्ज करेल त्या रोजी उपरोक्त वयोमर्यादा व शैक्षणिक अर्हता प्राप्त असलेले उमेदवार अर्ज करण्यास पात्र असतील.

## वेतन श्रेणी :-

| | |
|---|---|
| कारकून (सपोर्ट स्टाफ)<br>Clerk (Support Staff) | 450-15-510-20-590-25-690-30-810-35-950-40-1110 |

## निवड कार्यपध्दती :-

1) **ऑन लाईन परिक्षा :-** कारकून (सपोर्ट स्टाफ) श्रेणीतील पदांकरीता 90 गुणांची ऑनलाईन परिक्षा घेण्यात येईल. सदर परीक्षेच्या प्रश्नपत्रिका वस्तुनिष्ठ व बहुपर्यायी स्वरुपाच्या असतील यामध्ये (Reasoning, English Language, General Awareness (with special reference to banking), Computer Knowledge, Quantitative Aptitude Test या विषयावरील प्रश्नांचा समावेश असेल, तसेच परिक्षेचे माध्यम इंग्रजी / मराठी असेल.

2) **कागदपत्रे पडताळणी :-** उमेदवारास ऑनलाईन परिक्षेतील गुणांच्या गुणानुक्रमे बँक धोरणा प्रमाणे मुलाखतीपूर्वी शैक्षणिक व इतर संबधित मुळ प्रमाणपत्रांची प्राथमिक कागदपत्रे पडताळणीसाठी बोलावले जाईल. त्यावेळी उमेदवाराने मुळ कागदपत्रे उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. प्राथमिक कागदपत्रे पडताळणीमध्ये पात्र होणारा उमेदवारच बँक धोरणाप्रमाणे मुलाखतीस पात्र होईल.

3) **मुलाखत :-** कारकून (सपोर्ट स्टाफ) पदासाठी लेखी परिक्षेत उत्तीर्ण होणाऱ्या उमेदवारांना बँक धोरणानुसार भरावयाचे पद संख्येच्या प्रमाणात लेखी परिक्षेचे गुणानुक्रमे 10 गुणांसाठी मुलाखतीस बोलविण्यात येईल. उमेदवार मुलाखतीस गैरहजर राहिल्यास तो अंतीम निवडीस पात्र राहणार नाही.

**4)** उमेदवारावर कोणत्याही प्रकारची गुन्हे नसले बाबतचा उमेदवाराचा रहिवास असलेल्या संबधीत पोलीस स्टेशनचा चारित्र पडताळणी दाखला सादर करणे आवश्यक आहे.

**5)** उमेदवार हा महाराष्ट्रातील रहिवासी असावा त्या बाबत डोमेशियल सर्टिफिकेट सादर करणे आवश्यक आहे. तसेच उमेदवारास मराठी भाषेचे, संगणकाचे व बँकींग व्यवहाराचे ज्ञान असणे आवश्यक आहे.

**6) उमेदवारांची अंतीम निवड सुची :-** उमेदवाराचे ऑनलाईन परिक्षेतील गुण + मुलाखतीचे गुण यांची बेरीज करुन एकूण 100 गुणांपैकी गुणानुक्रमे अंतीम निवड सुची तयार करण्यात येईल.मात्र ज्या उमेदवारांना समान गुण असतील, अशा वेळी जो उमेदवार जन्म तारखेनुसार मोठा असेल, त्या उमेदवाराचा समावेश अंतीम निवड यादीत केला जाईल.

**7) परिविक्षाधीन कालावधी (प्रोबेशन पिरियड) :-** निवड करण्यात आलेल्या उमेदवारांना 1 वर्षासाठी परिविक्षाधीन (प्रोबेशनरी) सेवेत नेमणुक दिली जाईल नेमणुक दिलेल्या उमेदवारास परिविक्षाधीन कालावधीमध्ये रु.13,000/- दरमहा संकलित पगार देण्यात येईल.

**8) ऑन लाईन अर्ज व ऑन लाईन परिक्षाचे शुल्क भरण्याची पध्दत :-**

1) कारकून (सपोर्ट स्टाफ) पदा करीता बँकेच्या **www.jdccbank.com व www.jalgaondcc.com** या अधिकृत संकेत स्थळावरुन विहित ऑनलाईन पध्दतीने अर्ज स्विकारण्यात येतील इतर कोणत्याही प्रकारे अर्ज ग्राह्य धरण्यात येणार नाही. उमेदवारांनी ऑनलाईन अर्जात नोंदविलेला ई-मेल आयडी व मोाबईल क्रमांक चुकीचा / अपूर्ण तसेच मोबाईल क्रमांक NCPR रजिस्टर (DND) असल्यामुळे संपूर्ण प्रक्रिये दरम्यान त्याव्दारे पाठविल्या जाणाऱ्या सुचना, संदेश व माहिती उमेदवारांना प्राप्त न झाल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी संबधित उमेदवाराची राहील तसेच ई-मेल आयडी व संकेत वहनात येणाऱ्या तांत्रीक अडचणींना बँक जबाबदार राहणार नाही. सदर भरती प्रक्रिये दरम्यान बँकेच्या संकेत स्थळावर याबाबत वेळोवेळी अवलोकन करुन भरती प्रक्रियेची अद्यावत माहिती प्राप्त करण्याची जबाबदारी उमेदवारांची राहील.

2) उमेदवाराचे अर्ज ऑनलाईन पध्दतीने स्विकारण्यात येणार असल्याने अर्ज करतांना शैक्षणिक कागदपत्रे, अन्य प्रमाणपत्रे व पुरावे अपलोड करणे आवश्यक आहे. तथापी ऑनलाईन अर्जामध्ये उमेदवाराने त्याची पात्रतेनुसार काळजीपूर्वक संपूर्ण व खरी माहिती भरणे आवश्यक आहे. ऑनलाईन पध्दतीने अर्ज भरतांना काही चुका झाल्यास किंवा त्रृटी राहिल्याने भरतीच्या कुठल्याही टप्प्यावर अर्ज नाकारला गेल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संबधित उमेदवाराची राहील व याबाबत उमेदवारास तक्रार करता येणार नाही. ऑनलाईन अर्जात भरलेली माहिती बदलता येणार नाही. जाहिरातीत नमुद केलेल्या सर्व अटी व शैक्षणिक अर्हता वयोमर्यादा वगैरेची पात्रता तपासूनच ऑनलाईन अर्ज भरावा.

3) उमेदवारांची ऑनलाईन परिक्षा ही ऑनलाईन अर्जात नमुद केलेल्या गृहीत पात्रतेनुसार कोणतीही कागदपत्रे पूर्व तपासणी / छाननी न करता घेतली जाणार असल्यामुळे या परिक्षेत मिळालेल्या गुणांच्या आधारे उमेदवाराला निवडीबाबत कोणताही हक्क राहणार नाही. कागदपत्रांच्या पूर्ण छाननी नंतर उमेदवारांची पात्रता निश्चित करण्यात येईल. ऑनलाईन परिक्षेच्या प्राथमिक चाळणी नुसार उमेदवारांच्या कागदपत्रांची सखोल छाननी करण्यात येईल. सदर छाननी प्रक्रियेत अपात्र आढळल्यास त्यास निवड प्रक्रियेतून बाद करण्यात येईल. पात्रता धारण न करणाऱ्या उमेदवाराला भरतीच्या कोणत्याही टप्प्यावर अपात्र करण्याचे संपूर्ण अधिकार बँकेने राखून ठेवलेले आहे व याबाबत उमेदवारास कोणतीही तक्रार करता येणार नाही.

4) ऑनलाईन पध्दतीने अर्ज सादर करण्याच्या सविसतर सुचना बँकेच्या **www.jdccbank.com व www.jalgaondcc.com** या संकेत स्थळावर उपलब्ध आहेत.

5) कारकून (सपोर्ट स्टाफ) पदांकरीता रु.1000/- (सर्व करांसह) परिक्षाशुल्क आकारले जाईल. परिक्षाशुल्क हे ना परतावा राहील. परिक्षा शुल्काची रक्कम फक्त ऑनलाईन पध्दतीने भरावी लागेल.

6) परिक्षाशुल्क खालील प्रमाणे स्विकारले जाईल. परिक्षाशुल्क कोणत्याही परिस्थीतीत परत केले जाणार नाही.

उमेदवाराने सर्व प्रथम बँकेच्या संकेत स्थळावरील जाहिरात व सुचना वाचून घ्याव्यात त्यानंतर दिलेल्या लिंकवर क्लिक करुन **New Registration** या बटनावर क्लिक (Click) करावे व ऑनलाईन अर्ज परिपूर्ण भरावा. त्यानंतर परिक्षाशुल्क ऑनलाईन भरावयाचे आहे.

7) ऑनलाईन पध्दतीने अर्ज सादर करतांना उमेदवाराने स्वत:चे अद्यावत छायाचित्र (फोटो) JPG/JPEG या प्रकारामध्ये स्कॅन करुन व पांढऱ्या कागदावर काळ्या शाईच्या पेनाने स्वत:ची स्वाक्षरी JPG/JPEG प्रकारची स्कॅन करुन **www.jdccbank.com व www.jalgaondcc.com** संकेत स्थळावरील सुचने नुसार विहीत पध्दतीने अपलोड करणे अनिवार्य आहे.

8) ऑनलाईन अर्ज व ऑनलाईन परिक्षाशुल्क भरणेची अंतीम तारीख दि. 31/10/2025 पर्यंत असून, त्यानंतर संकेत स्थळावरील अर्ज् भरण्याची लिंक बंद केली जाईल.

**सर्व साधारण सुचना :-**

1) उमेदवाराने अर्जात भरलेली माहिती खोटी सादर केल्याचे किंवा सत्य माहिती दडवून ठेवल्याचे निदर्शनास आल्यास त्या उमेदवारांची नियुक्ती तात्काळ रद्द करण्यात येईल. तसेच त्या उमेदवारास पुढील भरती प्रक्रियेतून कायम स्वरुपी बाद करण्यात येईल.
2) ऑनलाईन परिक्षेनंतर पात्र उमेदवारांना मुलाखतीपूर्वी कागदपत्र पडताळणीसाठी बोलविले जाईल.
3) काही अपरिहार्य / आपत्कालीन कारणास्तव परिक्षा स्थगीत करणे / पुढे ढकलणे, अंशत: बदल करणे या बाबतचे सर्व अधिकार बँकेस राहतील.
4) भरती प्रक्रिये संदर्भात उदभवणारे वाद / तक्रारी बाबत बँकेचा निर्णय अंतीम राहील. याबाबत कुठल्याही प्रकारयचा पत्रव्यवहार स्विकारला जाणार नाही.
5) उमेदवारांना ऑनलाईन परिक्षा, कागदपत्र पडताळणी व प्रत्यक्ष मुलाखतीस स्वखर्चाने उपस्थित रहावे लागेल.
6) भरती प्रक्रियेत / निवड कार्यपध्दतीत बदल करण्याचा अधिकार बँकेस असेल व काही बदल झाल्यास वर्तमान पत्र व बँकेच्या संकेत स्थळावर प्रसिध्द केला जाईल. याबाबत अर्ज केलेल्या उमेदवारांना पत्राने लेखी स्वरुपात कळविले जाणार नाही.
7) उमेदवाराचे महाराष्ट्र राज्यात किमान 15 वर्ष अधिवास असणे आवश्यक आहे व जळगांव जिल्ह्यात अधिवास असणाऱ्या उमेदवारास प्राधान्य देण्यात येईल.
8) सामान्य प्रशासन विभाग अधिसुचना क्र.एसआरव्ही-2000/प्रक्र.17/2000/12, 28 मार्च 2005 व शासन परिपत्रक क्र.एसआरव्ही-2000/प्रक्र.17/2000/12, 1 जुलै 2005 नुसार विहीत केलेल्या नुसार व महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटूंबाचे प्रतिज्ञापत्र ) नियम 2005 अन्वये शासनाने गट अ, ब, क, ड मधील सेवाप्रवेशासाठी प्रतिज्ञापत्र नमुदा (अ) आवश्यक अर्हता म्हणून विहित नमुन्यातील लहान कुटूंबाचे प्रतिज्ञापत्र बंधनकारक आहे.
9) उमेदवाराची ऑनलाईन परिक्षा प्रामुख्याने जळगांव शहरातील केंद्रावर घेण्यात येईल. मात्र आवश्यकते नुसार जिल्ह्यातील किंवा महाराष्ट्रातील इतर केंद्रावरही ऑनलाईन परिक्षा घेतली जाईल.
10) उमेदवारास मराठी भाषेचे ज्ञान असणे आवश्यक आहे.
11) उमेदवाराने ऑनलाईन परिक्षासाठीचे कॉललेटर बँकेच्या **www.jdccbank.com व www.jalgaondcc.com** या वेबसाईटवरुन डाऊनलोड करुन घ्यावे त्या संबधीची सुचना एसएमएस व्दारे उमेदवारांना दिली जाईल. कॉललेटर डाऊनलोड करतेवेळी उमेदवारास रजिस्टेशन नंबर किंवा रोल नंबर किंवा जन्मतारीख किंवा पासवर्ड मिळालेला असल्यास तो टाकून कॉललेटर डाऊनलोड करता येईल. कॉललेटरवर उमेदवाराने स्वत:चे छायाचित्र चिटकवून घ्यावे. परिक्षेस येतांना

सदरचे कॉललेटर व ओरीजनल फोटो आयडेन्टीटी प्रुफ सोबत आणावे (पॅनकार्ड, पासपोर्ट, पक्के ड्रायव्हींग लायसन्स, आधारकार्ड, मतदान कार्ड) रेशनकार्ड किंवा शिकाऊ ड्रायव्हींग लायसन्स हे ओळखपत्र म्हणून वैध नाहीत.

12) ऑनलाईन परिक्षेसाठी उमेदवार उशिरा आल्यास अशा उमेदवारांना परिक्षेस बसता येणार नाही उमेदवाराने त्यांना दिलेल्या परिक्षेच्या निर्धारीत वेळेच्या किमान अर्धातास आधी परिक्षा केंद्रावर उपस्थित राहावे.

13) उमेदवारास त्याने केलेल्या ऑनलाईन अर्जात नमुद केलेले परिक्षास्थळ बदल करता येणार नाही मात्र बँकेस सदरचे परिक्षास्थळ बदलविण्याचा अधिकार बँक राखून ठेवत आहे. ऑनलाईन अर्जात परिक्षास्थळात बँकेकडून बदल झाल्यास तसे उमेदवारास एसएमएस व्दारे कळविले जाईल.

14) ऑनलाईन परिक्षा केंद्रामध्ये पर्याप्त संगणक उपलब्ध न झाल्यास किंवा काही तांत्रीक अडचण आल्यास अशा परिस्थितीत एकापेक्षा अनेकवेळा परिक्षा घ्यावी लागल्यास परिक्षा पेपरमध्ये बदल होईल व काठीण्य पातळी वेगवेगळी असू शकेल.

15) ऑनलाईन परिक्षा केंद्रामध्ये उमेदवाराचे वर्तन दोषास्पद आढळल्यास त्या उमेदवारास परिक्षा देता येणार नाही व त्या बाबत पुढील कायदेशिर कारवाई करण्याचे अधिकार बँकेस राहतील.

16) ज्या उमेदवाराने ऑनलाईन अर्ज संपूर्णरित्या भरलेला असेल त्याला बँकेच्या जाहिरातीमधील नमुद सर्व अटी मान्य आहेत असे समजण्यात येईल.

17) सदरची भरती प्रक्रिया पूर्णत: पारदर्शक आणि ऑन लाईन पध्दतीने होणार असल्याने उमेदवारांनी ऑनलाईन परिक्षा व निकालामध्ये मानवी हस्तक्षेप करण्याचा प्रयत्न करु नये. अथवा नोकरी लावणे संबधी कुठल्याही व्यक्तीशी आर्थिक व्यवहार करु नये. तसे आढळल्यास त्यास बँकेचे व्यवस्थापन व संचालक मंडळ जबाबदार राहाणार नाही.

18) सदर भरती प्रक्रिया कोणत्याही टप्प्यावर स्थगित किंवा रद्द करण्याचे अधिकार सर्वस्वी बँकेस राहतील.

19) काही कायदेशिर बाबी उदभवल्यास मे जळगांव न्यायालयाच्या कक्षेत सोडविण्यात येईल.

सदर पदांमध्ये वाढ किंवा घट झाल्यास रिक्त पदांच्या संख्येत बदल करण्या बाबतचे अधिकार पूर्णपणे बँकेस राहतील.

**कार्यकारी संचालक**
**दि जळगांव जिल्हा मध्य.सह.बँक लि.जळगांव**

**ठिकाण :- जळगांव**

**दिनांक :-**

माळी/ADM-EST/नोकरभरती-2025-4